# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 13/08/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर बायपास चोक उमरेड येथे दिनांक 12/08/2020 चे 13.36 वा. ते 14.45 वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ बी. जी – 8617 क्रमांकाच्या ट्रकला थांबवुन तपासणी केली असता आरोपी नामे– 1) शाहरूख ईस्माईल शेख वय 20 वर्ष 2) विक्की व्यकंट प्रुराम वय 30 वर्ष 3) राहुल श्यामराव बुध्दे वय 29 वर्ष तिन्ही रा. गोवर्धा ता. कुरखेडा जि. गडचिरोली व 4) जमील कुरेशी रा. कामठी जि. नागपुर यांच्या ताब्यातुन एकुण 16 (म्हशी)जनावरे कि. 1,44,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 16,44,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवा किशोर ठाकुर, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(ड)(घ)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)(ए)(1) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 184 मोवाका, सहकलम 109 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवा श्री. रमेशचंद त्रिपाठी 9765912425 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती मोनिका राउत, उपविभागिय पोलिस अधिकारी श्रीमती पोर्णीमा तावरे उमरेड विभाग उमरेड यांचे मार्गदर्शनात प्रभारी ठाणेदार परिवीक्षाधीन पोलिस उपअधिक्षक श्रीमती राजश्री पाटील, पोहवा किशोर ठाकुर, रमेशचंद्र त्रिपाठी, नापोशी रूपेश महादुले, पोशी चेतन माहुरकर, आशिष खराबे, ज्ञानीवंत गुरपुडे व उमेश बान्ते यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर